# राजर्षी

## विद्यार्थ्यांना आवाहन

**प्रिय विद्यार्थी, मित्र मैत्रिणींनो,**

दरवर्षीप्रमाणे **सन २०२६–२०२७** साठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपले विचार मांडण्यासाठी, लेख लिहिण्यासाठी **'राजर्षी'** या वार्षिक अंकाचे काम सुरु झाले आहे. यावर्षी **'जत्रा : गावच्या मातीचा उत्सव'** हा विषय घेऊन आपण लेखन करणार आहोत.

महाविद्यालयाच्या नियतकालिकासाठी गावोगावच्या जत्रा/यात्रा : गावच्या मातीचा उत्सव हा विशेष विषय नियतकालिकासाठी निवडण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवणात जत्रा–यात्रांना विशेष महत्त्व आहे. त्या केवळ धार्मिक उत्सव नसून गावची संस्कृती, लोकपरंपरा, लोककला, खाद्यसंस्कृती, सामाजिक जीवन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचे दर्शन घडविणारे महत्त्वाचे माध्यम आहे. या विषयावर विद्यार्थ्यांनी आपल्या गावातील किंवा परिसरातील जत्रा–यात्रेवर आधारित अनुभवपर, माहितीपूर्ण किंवा संशोधनात्मक लेख लिहावेत. लेखामध्ये जत्रेचे नाव, ठिकाण, ग्रामदैवत किंवा धार्मिक परंपरा, जत्रेचा इतिहास, प्रमुख विधी, पालखी किंवा मिरवणूक, पारंपारिक खेळ, कुस्ती, लोककला, बाजारपेठ, खाद्यपदार्थ, स्थानिक व्यवसाय, भाविकांची उपस्थिती तसेच बदलत्या काळानुसार जत्रेच्या स्वरुपात झालेला बदल याचा समावेश करता येईल.

विद्यार्थ्यांनी आपल्या प्रत्यक्ष अनुभवांना स्थानिक माहितीला आणि ज्येष्ठ व्यक्तिच्या आढवणींना लेखामध्ये स्थान द्यावे. शक्य असल्यास जत्रेची छायाचित्रेही लेखासोबत द्यावीत. लेख सुसंगत, शुध्दलेखनयुक्त, आणि स्वतःच्या शब्दात असावा. उत्कृष्ट तीन लेखांची निवड पारितोषिकासाठी करण्यात येईल. सर्व विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे सहभागी होऊन आपल्या गावच्या संमृध्द परंपरेचे आणि संस्कृतीचे दर्शन घडवावे.

**लेख लिहिण्यासाठी उपविषय :**

१. जत्रा–यात्रा : गावच्या संस्कृतीचा जागर
२. गावच्या जत्रेची गोष्ट
३. ग्रामदेवतांच्या जत्रा
४. प्रसिध्द देवस्थानाच्या यात्रा
५. पारंपारिक ग्रामीण जत्रा
६. विशेष धार्मिक जत्रा
७. बदलत्या काळातील जत्रा – यात्रांचे बदलते स्वरुप
८. आठवणींची जत्रा – जुन्या मित्रांच्या आठवणी
९. जत्रेचा रंग : परंपरेचा संग
१०. जत्रा, यात्रा – सामाजिक व धार्मिक जीवन

**विद्यार्थ्यांनी लेख लिहितांना पुढील मुद्यांचा विचार करावाः**

- जत्रेचे नाव ठिकाण : आपल्या गावातील/परिसरातील कोणत्या जत्रेवर लेख लिहित आहात हे स्पष्ट करावे.
- ग्रामदैवत व श्रध्दा : जत्रा कोणत्या देवता व देवस्थानाशी संबंधीत आहे. त्यामागील श्रद्धा कोणती आहे.
- इतिहास व परंपरा : जत्रेची सुरुवात कधी व कशी झाली याबाबतची स्थानिक माहिती द्यावी.
- खाद्य संस्कृती : जत्रेत मिळणारे विशेष पारंपारिक पदार्थ व त्यांचे महत्त्व
- स्वतःचे अनुभव आठवणी : जत्रेशी संबंधीत स्वतःचे अनुभव, भावनिक आठवणी किंवा एखादा विशेष प्रसंग लेखात मांडावा.

- बदलते स्वरुप : पूर्वीची जत्रा आणि आजची जत्रा यामधील बदल स्पष्ट करावे.
- संस्कृतीचे जतन : जत्रा/यात्रांमधुन कोणती लोकपरंपरा व सांस्कृतिक परंपरा यातील कोणत्या मूल्यांचे जतन होते.
- लेखन करतांना लक्षात ठेवा : लेखाची सुरुवात आकर्षक असावी. मांडणी क्रमबद्ध असावी आणि शेवट परिणामकारक असावा.
- लेख स्वतःच्या शब्दात आणि शक्यतो प्रत्यक्ष माहितीच्या आधारे लिहावा.

**महत्त्वाची सूचना**

- ✓ वरील विषयाव्यतिरिक्त इतर विषयावर किंवा आवांतर विषयावरील लेख स्वीकारले जाणार नाहीत.
- ✓ लेख लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचा लेख व फोटो अंकात छापला जाईल.
- ✓ प्रत्येक भाषेत (मराठी, हिंदी, इंग्रजी) लेख लिहिणाऱ्या प्रथम दोन विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षीस दिले जाईल.
- ✓ आपला लेख हा स्वलिखित असावा. संदर्भ पुस्तकाचा वापर केल्यास लेखाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची नावे लिहावीत.
- ✓ शब्द मर्यादा ८०० ते १००० पर्यंत
- ✓ स्वहस्ताक्षरात लेखन असावे. त्यासोबत एक फोटो द्यावा, लेखाच्या पहिल्या पानावर स्वतःचे पूर्ण नाव, वर्ग, मो. नं. याचा उल्लेख करावा.
- ✓ प्रस्तुत लेख वरील विषयांच्या अनुषंगाने अवलोकन व आकलन करणारे असावे.
- ✓ लेख जमा करण्याचा अंतिम दिनांक : ३१ डिसेंबर २०२६

**खालील प्राध्यापकांकडे आपले लेख व फोटो जमा करावा**

| वरिष्ठ महाविद्यालय | कनिष्ठ महाविद्यालय |
|---|---|
| • मराठी : डॉ. दीपक गायकवाड<br>• हिंदी : डॉ. मीना ठाकूर<br>• इंग्रजी : प्रा. नयनिका वाघमारे | मराठी व हिंदी : प्रा. शुभांगी भोसले<br>इंग्रजी : श्री. विनोद जाधव |

(डॉ. दीपक गायकवाड)
संपादक (मो. ९०४९०९७०३७)

श्री शाहू मंदिर महाविद्यालय पुणे-९

(डॉ. विलास पाटील)
प्राचार्य